**मे.व्यंकटेशकृपा शुगर मिल्स लिमीटेड,जातेगांव बु. ता.शिरूर, जि.पुणे यांच्या प्रस्तावित ४,९०० ते ७,५०० टन प्रतीदिन साखर निर्मीती विस्तारीकरण, ६० किलो/दिन आसवणी प्रकल्प व ३० मेगा वॅट सह विद्युत प्रकल्प उभारणीबाबतच्या जनसुनावणीचे इतीवृत्त.**

मे. व्यंकटेशकृपा शुगर मिल्स लिमिटेड, जातेगांव बु.ता.शिरूर,जि.पुणे. यांच्या प्रस्तावित ४,९०० ते ७,५०० टन प्रतीदिन साखर निर्मीती विस्तारीकरण, ६० किलो लिटर/ प्रती दिन आसवणी प्रकल्प व ३० मेगा वॅट सह विद्युत प्रकल्प उभारणीबाबत जनसुनावणी दि.२१.१२.२०१९ रोजी प्रकल्पाच्या ठिकाणी घेण्यात आली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेश क्र.ई ८९/२०१९ च्या सहसंचालक (ज.प्र.नि.)/पी.एच/बी ४९१८ दि.०३.१२.२०१९ नुसार खालील जनसुनावणीची समिती गठीत करण्यात आली.

१. अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी,पुणे.
(जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे प्रतिनीधी) — अध्यक्षा
२. प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा प्रतिनीधी) — सदस्य
३. उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,पुणे-२. — समन्वयक

जनसुनावणीचे समन्वयक तसेच उप-प्रादेशिक अधिकारी, श्री. उपेंद्र कुलकर्णी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-२ यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्षा, डॉ. जयश्री कटारे व जनसुनावणीसाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे स्वागत केले. प्रथमत: समन्वयकांनी सदर जनसुनावणीचे कारण विस्तृत केले. पर्यावरण व वने तसेच वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना दि.१४ सप्टेंबर, २००६ तसेच त्यात केले गेलेले बदल दि.०१, डिसेंबर, २००९ प्रमाणे काही प्रकल्पांबाबत जनसुनावणी घेणे अनिवार्य आहे, त्यानुसार सदर प्रकल्प या आधिसूचनेमध्ये मध्ये मोडत असल्यामुळे जनसुनावणी घेण्यात येत आहे.

तसेच समन्वयकांनी वर उल्लेखित केलेल्या अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या तारखेपूर्वी एक महिना आगोदर म्हणजेच १९.११.२०१९ रोजी मराठी वृत्तपत्र लोकसत्ता तसेच इंग्रजी वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यामध्ये जनसुनावणीबाबत जाहीर नोटीस देण्यात आली होती, त्याचप्रमाणे प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व मराठी तसेच इंग्रजी भाषेमधील संक्षिप्त टिप्पणी वेगवेगळ्या शासकिय कार्यालयात वाचण्यासाठी ठेवण्यात आला होता असे सांगितले. सदर जनसुनावणी समितीचे सदस्य प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि मंडळ, पुणे, हे तातडीच्या शासकिय कामानिमीत्त परगावी असल्यामुळे सुनावणीस हजर राहू शकत नाहीत असे सांगण्यात आले. त्यानंतर जनसुनावणी समितीचे मा.अध्यक्ष यांची परवानगी घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यास विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण करून खालिल संक्षिप्त माहिती उपस्थितांना दिली.

मे. व्यंकटेशकृपा शुगर मिल्स लिमीटेड, जातेगाव बु.ता.शिरूर,जि.पुणे.यांच्या प्रस्तावित ४,९०० ते ७,५०० टन प्रतीदिन साखर निर्मीती विस्तारीकरण, ६० किलो/दिन आसवणी प्रकल्प व ३० मेगा वॅट सह

विद्युत प्रकल्प उभारत असून सदर प्रकल्प हा सध्या अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्या जागेवर उभा राहणार असून प्रस्तावित प्रकल्पामध्ये हवा तसेच पाणी प्रदूषण होऊ नये यासाठी घेण्यात येणा-या उपाययोजनांबद्दल माहिती दिली. तसेच प्रस्तावित प्रकल्पाबाबतची थोडक्यात माहिती उपस्थितांना करून दिली.

डॉ. जयश्री कटारे, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्षा पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी यांनी जमलेल्या उपस्थितांना जनसुनावणी बाबतची संकल्पना विस्तृत केली, तसेच उपस्थितांना त्यांची मते, आक्षेप मांडण्याबाबत विनंती केली जेणेकरून त्यांची मते व आक्षेप हे पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल यामध्ये घेतली जातील तसेच उपस्थितांना ही एक संधी असून त्यांनी त्यांचे विचार व मते मांडावेत जेणेकरून पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येतील. तद्नंतर काही उपस्थितांनी आपल्या शंका मांडल्या त्या खालिल प्रमाणे, त्याचबरोबर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार यांनी त्याच्या शंकाना उत्तरे दिली.

१. **श्री. जयंत विरोळे, शिक्रापूर, ता. शिरूर,जि.पुणे**

- या प्रकल्पातून सांडपाणी निर्माण होणार आहे, त्याची विल्हेवाट कशी करण्यात येणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तक-** सदर प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी या प्रकल्पातून निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी शुन्य द्रव्य निस्सारण म्हणजे झिरो लिक्विड डिसचार्ज हि संकल्पना राबविण्यात येणार असल्याने प्रक्रिया केलेले सांडपाणी बाहेर सोडले जाणार नाही, त्याचप्रमाणे निर्माण होणा-या कंन्डनसेटवर सी.पी.यु या प्रक्रियेमार्फत प्रक्रिया केली जाणार आहे व प्रक्रिया केलेले सांडपाणी शीतकरणासाठी व प्रकल्पातच पुर्नवापर केला जाईल. आसवणी विभागातून निघणा-या सांडपाण्यावर मल्टीपल इफेक्टीव्ह इव्हॅपोरेटर लावण्यात येणार आहे.

२. **श्री.पंडित दरेकर, ता. शिरूर. जि.पुणे.**

- या प्रकल्पासाठी कामगांची संख्या किती असेल व स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येईल काय?

**प्रकल्प प्रवर्तक-** प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पासाठी बांधकाम टप्प्यात ५० कामगारांची आवश्यकता असून व संपूर्ण प्रकल्प कार्यांवित झाल्यावर साधारणपणे २३६ इतके मनुष्यबळ लागेल. यासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे.

३. **श्री.उपेंद्र कुलकर्णी, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२.**

- सध्या सुरू असलेल्या साखर कारखान्यातून किती सांडपाणी निर्माण होते व प्रस्तावित उद्योगांमधून सांडपाणी निर्मिती किती असेल?

**प्रकल्प प्रवर्तक-** सध्या सुरू असलेल्या साखर कारखान्यातून ३०० घनमिटर प्रती दिन इतक्या सांडपाण्याची निर्मीती होत असून त्यावर पूर्णपणे प्रक्रिया केली जात आहे. प्रस्तावित उद्योग सुरू झाल्यावर साधारणपणे औद्योगिक सांडपाणी निर्मिती ही ५०० घन मिटर इतकी असेल व त्या सांडपाण्यावर पूर्णपणे प्रक्रिया केली जाणार आहे.

४. **श्री.दिपक धुमाळ, गाणेगांव खालसा, ता.शिरूर,जि.पुणे.**

- सध्या निर्माण होणा-या सांडपाण्यावर करण्यात येणा-या प्रक्रियेचे स्वरूप काय आहे ?

**प्रकल्प प्रवर्तक-** सध्या निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्थरावरील प्रक्रिया करण्यात येत असून प्रक्रिया केलेले सांडपाणी शेतीसीठी वापरण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कंन्डनसेट पाण्यावर सी.पी.यु द्वारे प्रक्रिया करून सदर पाणी शितकरणासाठी व पुर्नवापरासाठी घेतले जात आहे.

५. **श्री.नारायण फडतरे, कोरेगांव भिमा, ता.शिरूर, जि.पुणे.**

प्रस्तावित प्रकल्पामध्ये पाण्याचा वापर काय असेल ?

**प्रकल्प प्रवर्तक-** विस्तारित प्रकल्पासाठी साधारणपणे १५०० घनमिटर प्रती दिन इतके पाणी लागणार आहे. तसेच त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परवानगीने पाटबंधारे विभागाकडून पाण्याची व्यवस्था करण्यात येईल.

६. **श्री. शिवाजी दरेकर, सणसवाडी, ता.शिरूर,जि.पुणे.**

- प्रस्तावित प्रकल्प विस्तारीकरणा बरोबर पर्यावरणाचा विकास करण्याबाबत काय उपाययोजना आहेत?

**प्रकल्प प्रवर्तक-** या प्रकल्पामधून निर्माण होणा-या सांडपाण्याचा पुर्नवापर होणार आहे तसेच हवा प्रदूषण होऊ नये यासाठी बॉयलरला इलेक्ट्रो स्टाटिक प्रेसिपीटेटर ही अत्याधुनीक यंत्रणा उभारण्यात येणार आहे जेणेकरून हवा प्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.

मा. अध्यक्षा डॉ.जयश्री कटारे यांनी सदर जनसुनावणीमध्ये काही बिगर सरकारी संस्था उपस्थित असतील तर त्यांनी आपले विचार मांडण्याबाबत विनंती केली. त्याअनुषंगाने खालील उपस्थितांनी आपले विचार मांडले.

७. **श्री. सुनंद रेड्डी, पर्यावरणवादी, जि.नालगोंडा, तेलंगणा.**

- श्री. सुनंदा रेड्डी यांनी सदर प्रकल्पास प्रथमत: पाठिंबा दर्शविला व प्रकल्प विस्तरीकरणाचे स्वागत केले त्याचप्रमाणे काही सुचनाही करण्यात आल्या. त्यामध्ये प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील भूजलाचे व पिकांचे नमुने घेऊन त्याची सद्यस्थिती त्याबाबत अहवाल तयार करण्यात यावा त्याचप्रमाणे पावसाचे पाणी संवर्धन करण्यासाठी साठवण टाकी बांधण्यात यावी, जेणे करून सदर पावसाचे पाणी वापरता येईल व भूजलाच्या पातळीमध्ये वाढ होईल. तसेच प्रकल्पाच्या १० कि.मी परिसरामध्ये वृक्ष रोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा. रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्षरोपण करण्यात यावे त्यामुळे वाहनांमुळे उडणा-या धुळीचे नियंत्रण होईल.

**प्रकल्प प्रवर्तक-** प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सदर सुचनेबाबत नक्की विचार केला जाईल असे आश्वासन दिले.

८. **श्रीमती मंगल प्रकाश हिंगोले, सरपंच जातेगांव बु.ता.शिरूर,जि.पुणे.**

- प्रस्पावित प्रकल्पामुळे शेतक-यांना काय फायदा होणार आहे तसेच प्रस्तावित प्रकल्पात स्थानिकांना प्रधान्य देण्यात येणार आहे काय?

**प्रकल्प प्रवर्तक-** प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे कारखान्याचे उत्पादन वाढणार असून परिणामी स्थानिक शेतक-यांना ऊसाचा दर वाढवून देता येणार आहे.त्याचप्रमाणे सदर प्रकल्पामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे, असे सांगितले.

९. **श्री. नवनाथ धारगुडे, ग्रामपंचायत सदस्य, पद्मावस्ती, सणसवाडी. ता. शिरूर. जि.पुणे**

- प्रस्तावित प्रकल्पाची गुंतवणुक किती असेल त्याचप्रमाणे या प्रकल्पामुळे हवा प्रदूषित होणार आहे यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे त्याचप्रमाणे कमी दराने परिसरातील रहिवाशांना फुलझाडे उपलब्ध करून देण्यात यावी जेणेकरून हवा प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यात येईल.

**प्रकल्प प्रवर्तक-** हवा प्रदूषणाचा विचार करता सहविद्युत प्रकल्पात हाय प्रेशर बॉयलर बसविण्यात येणार असून त्यास ७२ मि. उंचीचे धुरांडे व त्याचबरोबर इलेक्ट्रो स्ट्राटिक प्रसिपीटेटर बसविण्यात येणार आहे. तसेच अजून एका बॉयलरसाठी अश्याच प्रकारची उपाययोजना करण्यात येणार आहे जेणे करून हवा प्रदूषणाची पातळी केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळ त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारीत केलेल्या पातळीनुसार असेल.

कारखान्यामार्फत सवलतीच्या दराने झाडे दिली जातात त्याचबरोबर कारखाना स्वत: परिसरामध्ये हरित पट्टा विकसीत करून त्याचे संवर्धन सुद्धा करीत असतो.

तदृनंतर श्री.उपेंद्र कुलकर्णी , उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे-२ यांनी लोकसुनावणी समोर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दोन लेखी सुचना प्राप्त झाल्याचे सांगितले त्याचबरोबर त्या सुचना जनसुनावणीस हजर असलेल्या लोकांसमोर वाचून दाखवण्यात आल्या.

१. श्री. एस. व्यंकटेश रेड्डी, निथा स्वच्छंद सेवा सोसायटी, कुरनुळ, आंध्रप्रदेश यांनी हवेतील धुलीकणाचे प्रमाण कमी करण्यासाठी पाण्याचा वापर करण्यात यावा त्याचप्रमाणे केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कॉरपोरेट रिसपॉसिबिलिटी फॉर एन्व्हायरमेट प्रोटेक्शन या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे तसेच प्रकल्प परिसरातील गावामधील रहिवासांच्या आरोग्याची सद्यस्थिती जाणून घेण्यात यावी.

२. श्री. एच.मधुबाबू, रूरल एन्व्हायरमेंट एज्युकेशन ऍन्ड हेल्थ अवेरनेस सोसायटी, मुशीराबाद, हैदराबाद यांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या १० किमी रेडिअस मधिल रहिवाश्यांची आरोग्याची स्थिती तपासण्यात यावी, त्याचबरोबर परिसरातील पिकांची स्थिती जाणून घेण्यात यावी. प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणा-या सांडपाण्याचा वापर शेतीसाठी तसेच धुलीकण वातावरणामध्ये ऊडू नयेत यासाठी करण्यात यावा. त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरातील लोकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि शैक्षणिक तसेच आरोग्य तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी असे सुचित केले.

वरील दोन्ही उपस्थित असलेल्या लोकांनी केलेल्या सुचना प्रकल्प प्रवर्तक यांनी चांगल्या असल्याचे सांगितले त्यामुळे या सुचनांचा विचार नक्की करण्यात येईल असे नमूद केले.

डॉ. जयश्री कटारे, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती अध्यक्ष, यांनी सी.एस.आर फंडातील रकमेच्या वापरासाठी विस्तृतपणे योजना आखण्यात यावी त्याचप्रमाणे स्थानिक प्राधान्य लक्षात घेऊन सी.एस.आर फंडाचा वापर करण्यात यावा, असे सुचित केले.

शेवटी उपस्थितांकडून प्रकल्पाबाबत प्रश्न किंवा सल्ले उपस्थित केले जात नाही हे लक्षात आल्यावर मा. जनसुनावणी अध्यक्षा यांनी जनसुनावणीचे इतीवृत्त तज्ञ समिती पर्यावरण व वने तसेच वातावरण बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येईल, असे सांगून जनसुनावणी संपली असल्याचे जाहीर केले.

(उपेंद्र कुलकर्णी)
समन्वयक तथा उप प्रादेशिक
अधिकारी, म.प्र.नि मंडळ
पुणे-२.

डॉ. जयश्री कटारे
समिती अध्यक्ष तथा अप्पर जिल्हा
दंडाधिकारी, पुणे.